# शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादन, प्रेरणा व भावनिक बुध्दिमत्ता विकसनासाठीच्या कृतीकार्यक्रमाच्या परिणाकारकतेचा अभ्यास.

प्रा.गोकुल शामराव डामरे
स्व.उत्तमराव देशमुख अध्यापक महाविद्यालय,शेगांव.

विषयाची पार्श्वभूमी:

मानव हा इतर प्राण्यापेक्षा वेगळा आहे ते केवळ त्याच्या बुध्दीमुळे ! आपल्या जोरावर त्याने जगावर मात करण्याचा प्रयत्न देखील केला आहे. जगावर मात करण्याचे अनेक कारणे आहेत.त्यापैकी एक म्हणजे शिक्षण होय.शिक्षण हा मानवी जीवनातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे.शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते.शिक्षणामुळे व्यक्तीस पूर्णत्व प्राप्त होउन त्याला त्याची उपजीवीका भागविण्यास मदत होते.

आधूनिक काळात शिक्षण देण्यासाठी जास्तीत जास्त भर शाळेवर आहे.पूर्वीच्या काळात शिक्षणासाठी शाळा उपलब्ध नव्हत्या गुरूकुलामधे जावून शिक्षण घ्यावे लागत असे.शिक्षणावर फक्त उच्चवर्गीयांचाच अधिकार होता.परंतु काळानुरूप अनेक बदल होत जाउन सर्वासाठी शिक्षणाच्या सोयी उपलब्ध झाल्या.शिक्षण हा प्रत्येकासाठी आवश्यक घटक झाला.त्यासाठी अनेक शाळा उपलब्ध आहेत. शिक्षण घेत असताना अनेक घटकांचा समावेश होत असतो.त्यामध्ये भावनिक, बुध्दीमत्ता, प्रेरणा सारखे घटक असतात. तसेच प्रेरणायुक्त अध्यापन हे एक खेळ नसून ती एक विद्यार्थी जीवनातील महत्तवाची गरजच आहे आणि शिक्षणाची ध्येय साध्य करण्याचे एक अमोघ साधन आहे.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने जी अनेक प्रकारची उद्दिष्टे आहेत.त्यातील बरीचशी उदिद्ष्टे वर्ग अध्यापन पध्दतीतून साध्य होउ शकत नाहीत. म्हणून पाठ पध्दतीचा ठराविक साचा सोडून विविध प्रकारचे साधने देवून त्यांचे संयोजन करावे.

आजच्या युगात सगळ्याच क्षेत्रात तीव्र स्पर्धा आहे.शैक्षणिक संपादन हे फारच महत्त्वाचे झाले आहे. त्यानुसारच शिक्षणाची आणि आयुष्याची दिशा ठरते. म्हणुनच अभ्यास करणे अतिशय महत्त्वाचे झालेले आहे.यासाठी प्रथम विद्यार्थ्याला अभ्यासात रस असणे अत्यंत महत्त्वाचे आणि गरजेचे आहे.विद्यार्थ्यांनी नेहमी मनात एक सकारात्मक आशावादी वृत्ती जोपासावी व त्याला अभ्यासात कितपत यश हव आहे याची स्पष्ट कल्पना प्रथम त्याच्या मनात ठाम असावी लागते. अभ्यासाचे वर्णन करताना, अभ्यास हा आनंद निर्मीतीसाठी असतो तो अलंकाराप्रमाणे भूषणभूत होतो आणि तो कर्तबगारीला पोषक ठरतो त्यासाठी विद्यार्थ्यांच्या प्रेरणायुक्त अध्यापन आवश्यक घटक बनला आहे. म्हणून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादन, प्रेरणा व भावनिक बुध्दिमत्ता विकसनासाठी कृती कार्यक्रम राबवुन त्याची परिणामकारकता अभ्यासणे महत्वाचे आहे.

प्रेरणा :

वर्तनाला दिशा देणे म्हणजे प्रेरणा.विद्यार्थ्यांना अध्यापनामध्ये प्रेरणा निर्माण करण्यासाठी वेगवेगळ्या साधनांचा उपयोग करावा लागतो ते खालील प्रमाणे :

शैक्षणिक साधने:

१ सहशालेय साधने
२ सृजनशीलता
३ शाबासकी
४ बक्षिसे

भावनिक बुध्दिमत्ता

उच्च बुद्यांक असलेल्या व्यक्तीच्या जीवनातील यशस्वीतेचा अभ्यास करताना असे आढळून आले की, त्यांच्या पैकी २० टक्के व्यक्तीच जीवनात सुखी, समाधानी आहेत तर ८० टक्के व्यक्तींच्या बाबतीत सुखी, समाधानी, यशस्वी आयुष्याची भावना कमी आढळली की, त्या व्यक्ती बुध्दिमत्तेसोबत सर्वसामान्य

किंवा त्यापेक्षा थोड्या कमी बुध्दिमत्तेच्या व्यक्ती या जीवनात यशस्वी झाल्या आहेत. यावरुन असा निष्कर्ष काढण्यात आला की, जीवनात यशस्वी होण्यासाठी पारंपारिक पध्दतीने मापन केली गेलेली बुध्दिमत्ताच पुरेशी नसून त्याला भावनिक बुध्दिमत्तेची जोड असने गरजेचे आहे. भावनिक बुध्दिमत्तेचे केवळ एवढीच बाब लक्षात घेतली जाते, असे नाही तर भावनिक बुध्दिमत्तेमध्ये विविध घटकांचा समावेश होतो.

संशोधन निबंध विषयाची गरज व महत्व :—

विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी ह्या अयोग्य असतील तर त्यांना शैक्षणिक संपादन चांगले मिळविण्यासाठी खुप मेहनत करावी लागते.त्यासाठी विद्यार्थ्यांनी अध्यापनात प्रेरणायुक्त साधने वापरुन त्यामध्ये प्रलोभने द्यावी. जेणे करुन विद्यार्थी उत्स्फुर्त होतील.प्रलोभनांमुळे विद्यार्थ्यांचा सहभाग वाढतो व त्यांचा सर्वांगीण विकास चांगला होतो, त्यासाठीच आज त्यांना चांगल्या शैक्षणिक संपादनासाठी चांगल्या प्रेरणायुक्त साधनांची आवश्यकता आहे.अध्यापन प्रभावी,अर्थबोधक, मनोरंजक होण्यासाठी दैनंदिन अध्यापनात प्रेरणायुक्ती अध्यापनाचा वापर करणे गरजेचे आहे.

विद्यार्थ्यांचा शारिरीक, मानसिक व बौध्दिक विकास हा बुध्दिमत्तेच्या आधारे नैसर्गिकरित्या होत असतो. मुलांचा बौध्दिक विकास हा जन्मत: होण्यास सुरवात होते व वयाच्या पाच वर्षापर्यंत जवळ जवळ संपुर्ण विकास हा झालेला असतो.

विद्यार्थ्यांचे वा मानवाचे जीवनकार्य हे फक्त बुध्दिमत्तेवरच आधारलेले नसते तर भावनिक विकास हा काही अंशत: घडवून आणावा लागतो, आणि हा विकास परिस्थिती, परिसर, सहवास इत्यादी माध्यमातुन घडून येतो.

कार्य करीत असताना बुध्दिमत्तेसोबत भावनिक बुध्दिमत्तेचीदेखील जोड असेल तर ते कार्य उत्कृष्ठ होण्याची संभावना असते आणि ज्यांचा भावना व बुध्दिमत्तेचा विकास झालेला आहे. ती व्यक्ती इतर व्यक्तींच्या तुलनेत सुखी व समाधानी असतात.त्यांच्या कामाचा दर्जा उंचावलेला असल्याचे दिसुन येते.

विद्यार्थ्यांमध्ये भावनिक बुध्दिमत्ता किती प्रमाणात विकसित झालेली आहे, हे पाहण्यासाठी व भावनिक बुध्दिमत्तेला आणखी वाव मिळण्यासाठी यांची गरज आहे: शैक्षणिक संपादन हा घटक प्रत्येक विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्वाचा घटक आहे.शैक्षणिक संपादनामुळे विद्यार्थ्यांतील आत्मविश्वास वाढीस लागतो व कार्य करण्याचे धाडस वाढते.

शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट व्यक्तीमत्व विकास होय.हा विकास भावनात्मक, बोधात्मक, क्रियात्मक या उद्दिष्ठांमार्फत साधला जातो.विद्यार्थ्यांच्या बौध्दिक विकासासोबतच शारिरीक विकासही वाढीस लागणे महत्वाचे आहे,त्यासाठी विद्यार्थ्यांना व्यक्तीमत्व विकासासाठी किंवा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने शाळेत व शाळेबाहेर कार्यक्रम व उपक्रम राबविले जातात.तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या विविध प्रेरणा देणे आवश्यक आहे. विविधि प्रकारची प्रलोभणे, बक्षिसे, शाबासकी देउन विद्यार्थ्यांना शैक्षणिक संपादनामध्ये भर पाडु शकतो.पेरणायुक्त अध्यापनामुळे विद्यार्थ्यांची विविध विषयातील गोडी वाढण्यास मदत होते.विद्यार्थी कृतीशील होतात तसेच त्यांच्यामध्ये आत्मविश्वास वाढीस लागतो. विद्यार्थ्यांना शाळेविषयी आवड निर्माण होण्यास मदत होते.अभ्यासाचे ओझे वाटु नये यासाठी अध्यापनामध्ये प्रेरणायुक्त अध्यापन केल्यास अध्यापन हे मनोरंजक होउन विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्वविकासावर योग्य परिणाम होतो.विद्यार्थ्यांची भावनिक बुध्दिमत्ता व प्रेरणा मापन केल्या नंतर येणारे शेक्षिणिक संपादन निर्ष्कषावरुन जीवनातील महत्त्वाच्या पुढच्या इयत्तेत त्याची शैक्षणिक प्रगती साधण्यास मदत होईल.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादन विकासास भावनिक बुध्दिमत्ता व प्रेरणा पोषक ठरणारे घटक आहेत. यांचा विकास विद्यार्थ्यांत जेवढा जास्त होईल तेवढी विद्यार्थ्यांची प्रगती वाढत जाईल. विद्यार्थ्यांच्या शक्तीचा विकास होईल, विद्यार्थ्यांच्या प्रगतीस चालना मिळेल.

संशोधन निबंध विषयाचे शिर्षक :—

शालेय विद्यार्थ्यांच्या प्रेरणा व भावनिक बुध्दिमत्ता विकसनासाठीच्या कृतीकार्यक्रमाच्या परिणाकारकतेचा अभ्यास.

संशोधनाची निबंध विषयाचे उद्दिष्टये :—

प्रस्तुत संशोधनात समस्येची उदिष्टे पुढीलप्रमाणे आहे.

- शालेय विद्यार्थ्यांच्या संदर्भात प्रेरणा व भावनिक बुध्दिमत्ता या संकल्पनेचा अभ्यास करणे.

- शालेय विद्यार्थ्यांच्या प्रेरणेचे मापन करणे
- शालेय विद्यार्थ्यांच्या भावनिक बुध्दिमत्तेचे मापन करणे
- शालेय विद्यार्थ्यांच्या प्रेरणा व भावनिक बुध्दिमत्ता विकसनासाठी कृती कार्यक्रम तयार करणे
- शालेय विद्यार्थ्यांच्या प्रेरणा व भावनिक बुध्दिमत्ता विकसनासाठी तयार केलेल्या कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे
- शालेय विद्यार्थ्यांच्या प्रेरणा व भावनिक बुध्दिमत्ता विकसनासाठी कृती कार्यक्रमाची परिणाकारकता अभ्यासणे
- शालेय विद्यार्थ्यांच्या प्रेरणा व भावनिक बुध्दिमत्ता विकसित करण्यासाठी उपाययोजना सुचवणे

संशोधनाची निबंध विषयाची परिकल्पना :–

प्रस्तुत संशोधनात पुढीलप्रमाणे परिकल्पना मांडण्यात आल्या आहेत.

- शालेय विद्यार्थ्यांच्या प्रेरणा व भावनिक बुध्दिमत्ता विकसित करण्यासाठी तयार केलेल्या कृती कार्यक्रमाची परिणामकारकताबाबत फरक आढळतो.
- ग्रामिण व शहरी विद्यार्थी यांच्या प्रेरणा व भावनिक बुध्दिमत्ता विकसित करण्यासाठी तयार केलेल्या कृती कार्यक्रमाचे परिणाम कारकता बाबत फरक आढळतो.

संशोधन निबंध विषयाची व्याप्ती व मर्यादा :–

- प्रस्तुत संशोधनात अमरावती विभागातील माध्यमिक शाळांचा समावेश करण्यात आला आहे.
- प्रस्तुत संशोधनात ग्रामिण व शहरी विद्यार्थी यांचा समावेश करण्यात आला आहे
- प्रस्तुत संशोधनात विद्यार्थ्यांच्या प्रेरणा व भावनिक बुध्दिमत्ता विकसित करण्यासाठी तयार केलेल्या कृती कार्यक्रमाची परिणामकारकता या घटकांचा अभ्यास करण्यात आला आहे.

संशोधन निबंध विषयाची संशोधन पद्धती :–

प्रस्तुत संशोधनात प्रायोगीक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. अभ्यास विषयाची भविष्यकालीन स्थिती कशा प्रकारची आहे हे पाहण्यासाठी या पद्धतीचा उपयोग होतो.

संशोधन निबंध विषयाची नमुना निवड :–

प्रस्तुत संशोधनाकरीता संपूर्ण संशोधनाचा नमुना २५ होता.प्रस्तुत संशोधनासाठी यादृच्छीक पद्धतीने नमुना निवड करण्यात आली होती.

संशोधन निबंध विषयाची संशोधनाची साधने :–

संशोधनातील परिकल्पनांचे मूल्यांकन करून अंतिम निष्कर्ष काढण्यासाठी आवश्यक माहिती व आकडेवारीला संशोधनाची आधार सामग्री म्हणतात. ही आधार सामग्री विश्वासाई व वैध असावी लागते. गुणात्मक व परिणामात्मक आधार सामग्रीच्या प्राप्तीसाठी निरनिराळया प्रकारची तंत्रे व पद्धती वापरल्या जातात. त्यांनाच संशोधनाची साधने म्हणून संबोधल्या जाते.प्रस्तुत संशोधनात प्रश्नावली, चाचणी ही संशोधन साधने वापरण्यात आली होती.

माहितीचे संकलन व माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :–

संशोधन प्रक्रियेमध्ये विविध साधनांच्या आधारे जी माहिती गोळा केली जाते त्या माहितीला माहितीचे संकलन म्हणतात.प्रस्तुत संशोधनात विद्यार्थ्याकडून, पालक, शिक्षक,मुख्याध्यापक यांच्याकडून प्रश्नावली, चाचणी या साधनाद्वारे संपूर्ण माहिती व अहवाल यांच्याद्वारे माहितीचे संकलन केले व संकलित माहितीचे संख्याशास्त्राच्या शास्त्रीय पद्धतीने वर्गीकरण करण्यात आले.

शोध निबंध संख्याशास्त्रीय तंत्र :

प्रस्तुत संशोधनामध्ये माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी श्जश मूल्य या सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात आला आहे.

शालेय विद्यार्थ्यांच्या प्रेरणा व भावनिक बुध्दिमत्ता विकसनासाठी तयार केलेल्या कृती

कार्यक्रमाच्या परिणाकारकतेची तुलना दर्शविणारी सारणी

| गट | नमुना | मध्यमान M | प्रमाण विचलन (SD) | प्रमाण त्रुटी (ODM) | प्राप्त 't' | स्वाधिनता मात्रा (DF) | सारणी वरून t मूल्य | | सार्थकता | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रेरणा | २५ | २४.५ | ०.९६ | ०.२३ | ४.७८ | ४८ | ०.०५ | ०.०१ | ०.०५ | ०.०१ |
| भावनिक बुध्दिमत्ता | २५ | २३.४ | ०.६५ | | | | १.९९ | २.६३ | सार्थक | सर्थक |

संशोधन निबंध विषयाचे निष्कर्ष :—

- प्रस्तुत संशोधनात विद्यार्थ्यांच्या प्रेरणा व भावनिक बुध्दिमत्ता विकसित करण्यासाठी तयार केलेल्या कृती कार्यक्रमाची परिणामकारकता दिसून आली.
- ग्रामिण विद्यार्थ्यांच्या भावनिक बुध्दिमत्तेचे मध्यमान आणि शहरी विद्यार्थ्यांच्या भावनिक बुध्दिमत्तेचे मध्यमान यामध्ये ग्रामिण विद्यार्थ्यांची भावनिक बुध्दिमत्ता जास्त सकारात्मक आहे.
- ग्रामिण विद्यार्थ्यांच्या भावनिक बुध्दिमत्तेचे मध्यमान आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या मध्यमान यामध्ये लक्षणिय फरक आढळतो
- ग्रामिण विद्यार्थ्यांच्या भावनिक बुध्दिमत्तेचे मध्यमान या दोन्ही मध्यमानामध्ये विशेष फरक नाही.
- ग्रामिण विद्यार्थ्यांचे मध्यमान आणि विद्यार्थीनींच्या मध्यमान यावरुन विद्यार्थ्यापेक्षा विद्यार्थीनींमध्ये भावनिक बुध्दिमत्ता जास्त सकारात्मक आहेत
- ग्रामिण विद्यार्थ्यांचे मध्यमान आणि शहरी विद्यार्थ्यापेक्षा मध्यमान भावनिक बुध्दिमत्ता जास्त सकारात्मक आहे.
- स्त्रि पुरुषांमध्ये भावनिक बुध्दिमत्तेबाबतीत फरक आढळुन आला नाही
- कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुध्दिमत्तेत कोणत्याही प्रकारचा फरक आढळून आला नाही
- भावनिक बुध्दिमत्ता आणि संपादन यांच्यात लक्षणीय संबंध आढळुन आला.

संशोधन निबंध विषयाची शिफारशी :—

१.पाल्यांच्या समस्या व भावनिक स्थिती जाणून घेऊन त्या सोडवून पाल्यास प्रोत्साहन देण्यासाठी पालकास मदत होईल.

२.शिक्षक पालकांसाठी विविध शिबिर कार्यशाळा यांचे आयोजन करता येऊ शकते.

३.बालकाचा आत्मविश्वास मोठया प्रमाणात वृद्धींगत होईल आणि शैक्षणिक व सामाजिक स्थान उंचावेल.

४.समाजातील पालकांना, शाळेतील मुख्याध्यापकांना, शिक्षकांना मुलांचा शैक्षणिक सहभाग वाढविण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात.

५.मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी व शैक्षणिक योजना काय असायला हव्यात हे ठरविण्यास शासनाला देखील सदर संशोधन उपयुक्त ठरू शकतात.

६.शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादन, प्रेरणा व भावनिक बुध्दिमत्ता विकसनासाठीच्या कृतीकार्यक्रमाचा अवलंब करणे वाढेल.

संदर्भ ग्रंथ सुची :


- घोरमोडे के यु घोरमोड कला २००८ शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, नागपूर विद्या प्रकाशन
- जगताप ह.ना. २००६ शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र पुणे, नुतन प्रकाशन
- राणे एस एस २००२ मानसशास्त्र जळगांव, प्रशांत पब्लिकेशन
- वीरकर प्र.क. गद्रे प्र. ध., सामंत द गो १९६३, प्रायोगिक शैक्षणिक मानसशास्त्र पुणे ठोकळ प्रकाशन
- सिंह दलिप २०१० भावनिक बुध्दिमत्ता एक व्यावसायिक मार्गदर्शन, पुणे , डायमंड पब्लिकेशन्स.